**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. **( सर्व प्रकारचे हॉटेल, परमिटरुम, बेकरी, स्वीटमार्ट, चाट भंडार, धाबा इत्यादी ठिकाणची गर्दी नियंत्रित करणेबाबत.)**

**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड**

क्र.२०२०/आरबी-१/डे-२/टे-४ /कोरोना/सीआर-

दि. १८/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

तथापि माझ्या असे निदर्शनास आले आहे की, नांदेड जिल्हयात सर्व प्रकारचे हॉटेल, धाबे, परमिटरुम, बेकरी, स्वीटमार्ट, चाट भंडार, इत्यादी ठिकाणी मोठया प्रमाणात नागरीकांची गर्दी होत आहे. त्यामुळे जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी नांदेड जिल्हयातील सर्व प्रकारचे हॉटेल, धाबे, परमिटरुम, बेकरी, स्वीटमार्ट, चाट भंडार, इत्यादी ठिकाणी खालील प्रमाणे उपायोजना करणे बंधनकारक आहे.

१) हॉटेलमधील दोन टेबल मधील अंतर किमान ३ मीटर असावे.

२) हॉटेलमधील प्रत्येक टेबलवर दोन ते तीन पेक्षा अधिक व्यक्ती बसणार नाही याची दक्षता घ्यावी

३) हॉटेलबाहेरील खुल्या जागेतील व्यवसायाच्या ठिकाणी (जसे चाट भांडार इत्यादी) पाच पेक्षा जास्त व्यक्ती एकावेळेस थांबणार नाही याची दक्षता घ्यावी.

४) शक्यतोवर हॉटेल मध्ये येणारे ग्राहकांना पार्सल नेण्याची विनंती करावी व तशा प्रकारचे सुचना फलक हॉटेल बाहेर लावावे व तशी सोय उपलब्ध करुन द्यावी.

५) कोणत्याही कारणामुळे हॉटेलमध्ये गर्दी होणार नाही आणि शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) अन्न व औषध प्रशासन/स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेल्या परवान्यातील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे.

७) हॉटेलमध्ये ग्राहकांसाठी सॅनेटायजर, हॅन्डवाश, साबन यासारख्या स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या साधन उपलब्ध करुन द्यावीत.

नांदेड जिल्हयातील सर्व हॉटेल, परमिटरुम, बेकरी, स्वीटमार्ट, चाट भंडार, धाबा चालकांनी वरील बाबींचे उल्लंघन केल्यास त्यांचे विरुध्द भारतीय दंड संहिता कलम १८८ नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ. विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
४) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
५) पोलीस अधीक्षक, नांदेड
६) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड,
७) सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,नांदेड
८) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
९) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
१०) सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपंचायत, जि.नांदेड

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**